**नि.दि.दा.क्र.१७३/२०१६**
नि.क्र.२६९ लगत
दि.१८.०१.२०२५

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथेवर जबाबः–**

**नांव :– विशाल सुरेश मांडोत.**

७. माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/–
**(एस.ए.विराणी)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

दि. १८.०१.२०२५.

**पुढील सरतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. एन. येळे यांच्यातर्फेः–**

८. मी नि. २६७/१ वर फॉरिन्सक कंपनी यांचे बिल आणि नि. २६७/२ वर त्यांचे एक्सपर्ट ओपिनियन हजर केलेले आहे. सदरचे अस्सल बिल असल्याने व या साक्षीदारामार्फत भरण्यात आलेले असल्याने त्यास **नि. २७०** देण्यात येते. एक्सपर्ट ओपिनियन रिपोर्ट ची अस्सल प्रत असून त्यावर फॉरिन्सक कंपनीचे सही शिक्का आहे. सदरच्या रिपोर्टला भारतीय पुरावा कायदा अंतर्गत गृहतक असल्याने **नि. २७१** देण्यात येते.

९. नि. २३६/१ वर पोलिस अधिक्षक पुणे यांना दि. २०.१०.२०२१ रोजी अर्जाची प्रत आहे. सदरचा अर्ज मी स्वतः लिहीलेला असून त्यावर पोलिस अधिक्षक कार्यालयाची पोहोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२७२** देण्यात येते. नि. २३६/२ वर सदरचा अर्ज पोलिस अधिक्षक कार्यालय यांना पोस्टाने पाठवल्याबाबतची पावती आहे. त्यास जनरल क्लॉजेस ॲक्ट नुसार गृहतक असल्याने **नि. २७३** देण्यात येते. नि. २३६/३ वरील कागद हे दि. २२.०४.२०२२ रोजी पोलिस अधिक्षक यांना पाठविलेल्या माझा लेखी जबाबाची प्रत आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.२७४** देण्यात येते. सदरचा जबाब पोलिस अधिक्षक यांना पोस्टाने पाठवल्याबाबतची पोहोच नि. २३६/४ वर हजर केलेली आहे. त्यास जनरल क्लॉजेस ॲक्ट नुसार गृहतक असल्याने **नि. २७५** देण्यात येते. नि. २३६/५ वर पोलिस अधिक्षक पुणे ग्रामीण यांना दि. १४.०७.२०२२ रोजी पाठविलेलया अर्जाची स्थळप्रत आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदरच्या अर्जाची प्रत

मुख्यमंत्री आणि पोलिस महासंचालक आणि पोलिस उपविभागीय अधिकारी, कोल्हापूर यांना देखील पाठवले आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२७६** देण्यात येते. सदरचा अर्ज पोस्टाने पाठवल्याबाबतची पोहोच पावती नि. २३६/६, २३६/७ आणि २३६/८ येथे हजर केलेली आहे. त्यास जनरल क्लॉजेस ॲक्ट नुसार गृहतक असल्याने **नि. २७७, २७८ आणि २७९** देण्यात येते.

**१०.** नि. २४०/१ अन्वये दि. २०.०४.२०२२ रोजी यवत पोलिस स्टेशन येथे उपनिरीक्षक श्री. गंपले यांनी त्यांच्या मोबाईलवरुन माझ्या मोबाईलवर आलेल्या कॉल लॉगची प्रिंट हजर केलेली आहे. सदरची प्रिंट मी स्वतः काढलेली आहे. त्यास ओळखीसाठी **नि. २८०** देण्यात येते. आणि साक्षीदाराला भारतीय पुरावा कायदा कलम ६५ बी प्रमाणे प्रमाणपत्र देण्याचे अटीवर निशाणी देण्यात येत आहे. नि. २४०/२ वर दि. २४.०४.२०२२ मी माझ्या मोबाईलवरुन गंपले साहेबांच्या मोबाईलवर माझ्या जबाबाच्या पीडीएफ पाठविलेल्या जबाबाची व्हॉट्सअपची प्रिंट आहे. त्यास ओळखीसाठी **नि. २८१** देण्यात येते आणि साक्षीदाराला भारतीय पुरावा कायदा कलम ६५ बी प्रमाणे प्रमाणपत्र देण्याचे अटीवर निशाणी देण्यात येत आहे. नि. २४०/३ येथील कागद दि. २६.०४.२०२२ रोजी उपनिरीक्षक गंपले यांनी मला पाठविलेले समजपत्राची अस्सल प्रत आहे. त्यास **नि. २८२** देण्यात येते. सदरचे समजपत्र नि. २४०/४ वरील पोस्टाच्या पाकीटाद्वारे प्राप्त झाले होते. त्यास **नि. २८३** देण्यात येते. नि. २४०/५ सोबत दि. १६.१०.२०२१ रोजी तक्रार दिल्यानंतर तपासी अंमलदार हवालदार गाडेकर व प्रतिवादी क्र. ५ रमेश कुंतीलाल मांडोत हे दि. १६.१०.२०२१ रोजी स्थळ पाहणी करण्यास आले असताना सीसीटीव्ही कॅमेरामधील रेकॉर्डींगचे दोन फोटो हजर केलेले आहे. त्यांना फक्त ओळखीसाठी **आर्टिकल अ** आणि **आर्टिकल ब** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. एस. काळे यांच्यातर्फेः–**

**११.** हे म्हणणे खरे आहे की, नि. ४० वरील कोर्ट कमिशनरचे अहवाल मला मान्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१६.१०.२०२१ रोजीच्या घटनेबाबत मी प्रतिवादी क्र. १ ते १० यांना लेखी स्वरुपात कळविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते १० यांना कळविल्याबबात कागदोपत्री पुरावा मी या केसकामी हजर केलेले नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, १ ते १० यांना मी पत्र पाठवून कळविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि. १६.१०.२०२१ रोजीच्या घटनेबाबत त्यानंतरच्या तारखांना मी न्यायालयात पुरसीस देऊन कळविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दि. १६.१०.२०२१ च्या घटनेबाबत सन २०२४ मध्ये दिलेल्या दुरुस्ती अर्जाच्या आधी मी कोणतीही पुरसीस देऊन न्यायालयात कळविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, १६.१०.२०२१ ची घटना घडलीच नसल्यामुळे मी त्याबाबत कळविले नाही. तसेच

प्रतिवादींना देखील सदर घटनेबाबत कळविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, १६.१०.२०२१ च्या घटनेबाबत मी प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, २०.१०.२०२१ पोलिस अधिक्षक पुणे ग्रामीण यांना दिलेले अर्ज खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, २०.१०.२०२१ च्या पत्राची प्रत प्रतिवादी क्र. १ ते १० यांना पाठविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. २२.०४.२०२२ आणि दि. १४.०७.२०२२ रोजीच्या जबाबाची व पत्राची प्रती मी प्रतिवादी क्र. १ ते १० ना पाठविली नव्हती. साक्षीदार म्हणतो सदरचा अर्ज आणि जबाब मी पोलिसांना प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्याविरुध्द कारवाई करण्याकरीता पाठविला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे कागदपत्र मी २०२४ च्या आधी न्यायालयात हजर केलेले नव्हते.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, नि. २७१ वरील एक्सपर्ट ओपिनियन प्राप्तीसाठी योग्य ते कायदेशीर मार्ग अवलंबले नाही. हे म्हणणे खरे नाही की, उत्तरेकडील दक्षिण उत्तर ६ फुट आणि पूर्व पशिचम ११ फूट या जागेचा ताबा मला कधीही प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, १६.१०.२०२१ ला माझ्या मालकीचे फर्निचर काढून प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी दावा मिळकतीमधील आतील दरवाज्यास फळ्या मारुन बंद केले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी माझ्या मालकीचे १०,००० रुपयेच्या औषधांच्या बॉक्सचे नुकसान केले हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. सदरचा कागदोपत्री पुरावा मी न्यायालयात हजर करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी माझ्या दुकानातील बोर्ड ऑईल पेंटने पुसून टाकल्या, हे मी खोटे सांगत आहे.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या ताब्यातील दावा मिळकत मी ३०००० डिपॉझिट आणि २००० लायसन्स फी प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्याकडून घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे लीव्ह ॲण्ड लायसन्स करार मी माझे मेडीकल शॉपचे लायसन्स मिळण्यासाठी हजर केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, १९.१०.२०१५ ला प्रतिवादींनी लीव्ह ॲण्ड लायसन्स करारानुसार मुदत संपल्याबाबत आणि ताबा परत मागणी केल्याची नोटीस पाठविलेली आहे. साक्षीदार म्हणतो सदर नोटीसीमधील मजकूर खोटा आहे.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने आणि वकिलांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः- १८.०१.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,दौंड, जि. पुणे.